# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक ४/०७/२०२१ (रविवार )

---

## गांजाची वाहतुक करणाऱ्या इसम जेरबद पोलीस स्टेशन बोरी ची कार्यवाही

पोलीस स्टेशन बोरी येथील पथकास दिनांक दि.३.०७.२१ रोजी गुप्तबातमीदाराव्दारे माहिती मिळाली की एक इसम आपले ताब्यातील एका फिक्क्ट निळसर रंगाचे टोयोटा ॲलटीस कार क्र .डीएल–७ सीजी–४३४१ मध्ये अंमली पदार्थ गांजा घेवुन चंद्रपुर कडुन नागपुरचे दिशेने रोडनी येत आहे, या माहिती वरुन स्टॉफसह सरकारी वाहनाने बोरखेडी रेल्वे टोल नाका जवळ, चंद्रपुर ते नागपुर रोडवर पंचासह पोलीस स्टॉफचे मददतीने नाकांबदी करण्यात आली असता मिळालेल्या खबरेप्रमाणे एका फिक्क्ट निळसर रंगाचे टोयोटा ॲलटीस कार क्र.डीएल –७ सीजी –४३४१ ही चंद्रपुर कडुन नागपुर कडे जाताना दिसुन आल्याने सदरचे वाहन पोलीस स्टॉफचे मददतीने थांबवुन वाहन चालक व वाहनांची झडती घेतली असता वाहनात ३५ नग खाकी रंगाचे प्लॅस्टीक वेष्टनात प्लास्टीक सेलोटेपने सिलबंद व पॅकींग असलेले बंडलामध्ये मध्ये गुंगीकारक वनस्पती ओलसर/दमट गांजा एकुण ६९ किलो ५०० ग्रॅम गांजा कि.१०,०००/रू प्रती किलो प्रमाणे एकुण रुपये ६,९५,०००/रू, चा मिळुन आला. सदर अमली पदार्थ (गांजा), आरोपीचा एक मोबाईल, नगदी १०००/– रू, टोयोटा कार वाहन असा एकुण कि. १२,०६,०००/.रू चा माल जप्त करून आरोपीस ताब्यात घेवून त्याचे विरुध्द पो.स्टे. बोरी येथे अप क्रमांक २८९/२०२१ कलम २०,२२ एनडीपीएस ॲक्ट गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सपोनि सतिश सोनटक्के मो क्र. ८३०८२३२५०६ हे करित आहेत.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री.राहुल माकणीकर, उप विभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्री.राजेन्द्र चव्हाण यांचे मार्गदर्शनात तसेच ठाणेदार बोरी ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन बोरी चे सपोनि माणिक चौधरी, पोउपनि आशिष मोरखेडे, संजय भारती, परिपोउपनि कुमुंदिनी पाचोडे, पोहवा मिलींद नांदुरकर, संजय बान्ते, पोना सतेन्द्र रंगारी, राजु कापसे, नारायण भोयर, पोशि राकेश तालेवार, विवेक गेडाम, पंकज ढोके, विनायक सातव व पोशि संजय वैघ यांनी पार पाडली.

(सदर बातमीचा फोटो जोडला आहे.)




## —: जबरी चोरी :—

पो.स्टे.कन्हान :— बबलु तुलाराम सोनकुसरे वय ३२ वर्षे रा. रामटेक जि. नागपुर हे आपली ॲक्टीव्हा मोपेड वरुन रामटेक वरुन नागपूर येथील आपल्या सासुरवाडीला पत्नी व मुलीसह गेले होते. दि. ०२/०७/२०२१ रोजी पत्नी व मुलीसह रामटेक ला परत जात असता नागपुर—मनसर हायवेरोड वराडा शिवारातील बंद टोल नाका ५ किमी अंतरावर वेळ २२/२० ते २२/४० वा. दरम्यान काळया रंगाचे एव्हेंजर मोटार सायलक वर बसुन, काळया रंगाचा शर्ट घोतलेला व लांब केस असलेला एक अनोळखी इसमाने ॲक्टीव्ह गाडीचे मागे येवुन पत्नीचे खांदयावरील लेडीज बॅग, ॲक्टीव्हा गाडीला लात मारून हिसकावुन पळुन गेला. बॅग मध्ये नगदी ८,००० रू. + २ ग्रॅ. सोन्याचे मणी किं. ९,७०० रू. + चांदीचे पायपट्टया कि. ३,००० रू. + एमआय कंपनीचा मोबाईल किं. ८,००० रू. असा एकुण २८,७०० रू. चा माल व कागदपत्रासह जबरीने हिसकावुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी बबलु तुलाराम सोनकुसरे वय ३२ वर्षे रा. रामटेक जि. नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्रमांक कलम ३९२ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला, आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास पोउपनि जावीद शेख मो.क्र.९४०३६ ९२७६६ हे करीत आहे.

## —: चोरी :—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत मौजा घोगली येथे दिपक राजदेव पांन्डे वय ३७ वर्श रा, गोटफार्म रा, प्लॉट ५४ गोधणी रोड बापु नगर झिंगाबाई टाकली नागपुर यांचे खाली प्लॉट आहे, त्यांनी सदर प्लॉटवर बांधकाम करणे कामी ६५ नग लोखंडी प्रोफाईल शिट किंमती २६,००० रू, १२ फुटाचे ५५ लोखंडी ऍंगल किंमती २०,००० रू ,१५० लाकडी बल्या किंमती १०,००० रू व सिमेंट चे ३० पोल किंमती १२,६०० रू असा एकुण ६८,६०० रू चे ठेवलेले संपुर्ण बांधकामाचे साहीत्य कोणीतरी अज्ञात इसमांनी दिनांक ०२.०७.२०२१ चे १६.०० वा. दरम्यान चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी दिपक राजदेव पांन्डे वय ३७ वर्ष रा, गोटफार्म रा, प्लॉट ५४ गोधणी रोड बापु नगर झिंगाबाई टाकली नागपुर तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३७९ **भा.द.वि.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा १६११ नावेद खान मोनं ८२०८५ ११६६ हे करीत आहे.

## —: फसवणुक (ऑनलाईन) :—

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत २ किमी अंतरावरील काकडे ले आऊट येथील निवासी ओमप्रकाश धनंजय पंडीत यांनी दि. २८/७/२१ रोजी स्वताच्या फोन पे अकांउट मधुन मित्राला पैसे पाठविले होते, परंतु ते पैसे मित्राच्या अकाउंट मध्ये गेले नाही तर यांनी गुगल वर कस्टमर केअर चा अंकाउंट नंबर शोधुन मो क्र. ९१६२९७१९३१४१ वर फोन लावला असता फोन लागला नाही. त्या नंतर यांना मो. क्र.७०६४३८६७४९ वरून फोन आला की, मी एस.बी.आय.बॅक मधुन बोलत आहे तसेच फिर्यादीस नेट बॅकींग व युनो मोबाईल ॲप आहे का, असे विचारून मोबाईल वर ॲनी डेस्क ॲप डाउनलोड करण्यास सांगितले त्यानंतर बॅकींग प्रोसेस केली, नेट बॅकींग प्रक्रीया करत असता, ओमप्रकाश धनंजय पंडीत चे एसबीआय बॅक च्या एफडी खात्यावरून युनो मोबाईल ॲप वरून ओडी—लोन अगेन्स्ट एफडी योनो अकाउंट नं. ४०२५९५८५७०२ तयार करून फिर्यादीचे एसबीआय बॅक खाते क्र. ३७७७७४५७९६९ वरून **८७,५७५/— रू.कर्ज मंजुर करून ऑनलाईन फसवणुक** केली.

सदर प्रकरणी फिर्यादी ओमप्रकाश धनंजय पंडीत वय २७ वर्ष रा काकडे ले आउट सावनेर चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी मोबाईल क्रमांक ७०६४३८६७४९ चे धारकाविरुध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६७/२०२१ कलम ४२० भा.दं.वि. सह कलम ६६ सी,६६ ड माहीती तत्रंज्ञान अधिनियम २००० गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो नि.मारोती मुळुक मो. नं. ९५५२५ ६४०४७ हे करीत आहे.

## —: अकस्मात मृत्यु :—

पो.स्टे. कुही :— अंतर्गत २२ किमी अंतरावरील मौजा उंद्रीगाव येथील तलावात दि. ०२/०७/२०२१ रोजी १२/३० वा. सुमारास विनोद नंदलाल नेताम वय ३६ वर्ष, रा. केसोरी ता. देवरी जि. गोदीया ह.मु. पवन बियाणी खदान पाचगाव ता. उमरेड हा मासे पकडण्या करीता तलावात गेला त्याला पोहता येत नसल्याने मासे पकडत असतांनी त्याचा तोल जावुन तलावात पडला व पाण्यात डुबुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. लक्ष्मी विनोद नेताम वय ३० वर्ष, रा. केसोरी ता. देवरी जि. गोदीया ह.मु. पवन बियाणी खदान पाचगाव ता. उमरेड चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे अ.मृ.क्र. २९/२०२१ कलम : १७४ जाफौ नोंद करण्यातं आला असून पुढील तपास पोहवा दिलीप लांजेवर मो.क्र.७०८३०७९७५५ हे करित आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**